**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२४८/२०२६**
**निशाणी क्र.१ खालील आदेश**

१. अर्जदाराने प्रस्तुत अर्जाव्दारे **खेड** पोलीस ठाणे, पुणे येथील **गु.र.क्र. २५६/२०२६** या कामी जप्त केलेला मुद्देमालाच्या अंतरिम ताब्याची मागणी केली आहे.

**अर्जदार यांच्या अर्जातील कथने थोडक्यात खालील प्रमाणे –**

**०२.** अर्जदार याचे सदर गुन्ह्याकामी जप्त वाहन टोयोटो कंपनीची इनोव्हा ही चारचाकी वाहन ज्याचा नोंदणी क्र.**एम.एच.१४ के.एल. ७५७६** असा आहे. तिचा चेसीस क्र.**MBJJB**8**EM**501630818-0922 व इंजिन क्र.2**GDA**682979 असा आहे. सबब सदरचा मुद्देमाल हा अर्जदाराने बंधपत्रावर अंतरीम ताब्यात मिळणेबाबत विनंती केली आहे.

**०३.** अर्जाचे कामी तपासी अधिकारी व सहा.सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागवण्यात आले. तपासी अधिकारी व सहा.सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे देवून सदर जप्त वाहन अर्जदार यांना परत देणेबाबत हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनानुसार सदर वाहन हे गुन्हयातील महत्वाचा पुरावा असून ते अर्जदारास परत दिल्यास अर्जदार त्यामध्ये फेरबदल करण्याची, विक्री करण्याची, तसेच सदर वाहन अशाच प्रकारच्या गुन्हयात पुन्हा वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अर्जदारने नमूद वाहनाची विमा कागदपत्रे प्रस्तुत अर्जासोबत दाखल केलेली नाहीत अशी हरकत घेवून अर्ज नामंजूर करण्याविषयी विनंती केली.

**०४.** उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराने वाहन नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत, अर्जदार यांचे आधारकार्डची प्रमाणीत प्रत, इ.कागदपत्रे दाखल केलेली आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार हे वर नमूद वाहनाचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसून येते. महत्वाचे म्हणजे अर्जदाराशिवाय जप्त वाहनाचा ताबा अन्य कोणीही मागितलेला नाही.

**०५.** तसेच अर्जदाराने त्याच्या शपथपत्रामध्ये कोर्ट आदेश करेल त्याप्रमाणे अटी व शर्ती मान्य करण्यास तयार असल्याचे कथन केले आहे. या कामी जप्त केलेले वाहन हे पोलीस ठाणे आवारात तसेच आहे त्या स्थितीत पडून राहिल्यास ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब वरील बाबी विचारात घेता मी या निर्णयाप्रत आली आहे की, अर्जदारास वर नमूद वाहनाचा अंतरिम ताबा हा योग्य त्या

अटीवर देणे उचित होईल. म्हणून प्रस्तुत अर्जाचे कामी मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. **खेड** पोलिस ठाणे, पुणे येथील गु.र.क्र. २५६/२०२६ या कामी जप्त असलेले वाहन म्हणजेच टोयोटो कंपनीची इनोव्हा ही चारचाकी वाहन ज्याचा नोंदणी क्र.**एम.एच.१४ के.एल. ७५७६** असा आहे. तिचा चेसीस क्र.**MBJJB**8**EM**501630818-0922 व इंजिन क्र.**2GDA682979** याचा अंतरीम ताबा अर्जदारास रक्कम रुपये **१२,००,०००/- (रुपये बारा लाख मात्र)** इतक्या रक्कमेचे हानिरक्षण बंधपत्र घेवून खालील अटीवर देण्यात यावी.

**अ)** अर्जदाराने कोर्ट हुकूम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल कोर्टासमोर हजर करावा.

**ब)** अर्जदाराने सदर मुद्देमालात कोणताही फेरबदल, हस्तांतरण, तबदील अगर त्याची विक्री करणेची नाही.

**क)** अर्जदारने मुद्देमालाचा अंतरीम ताबा घेताना मुद्देमालाच्या सद्यस्थिती दर्शविणारे चार छायाचित्रे तपासी अधिकारी यांच्या स्वाधीन करण्याची आहेत.

**ड)** तपासी अधिका-याने मुद्देमालाचा अंतरीम ताबा देताना तपशिलवार पंचनामा करुन तो या गुन्हयाकामी दाखल होणा-या दोषारोपपत्रासोबत सादर करणेचा आहे.

**इ)** या आदेशाची प्रत तपासी अधिकारी यांना देणेत यावी.

GIRHE ANNASAHEB JAGANNATH
Digitally signed by GIRHE ANNASAHEB JAGANNATH
Date: 2026.07.07 13:54:17 +0530

**(अ. ज. गिऱ्हे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खेड-राजगुरूनगर, जि.पुणे.

खेड-राजगुरूनगर
दिनांकः.०७/०७/२०२६

| **C E R T I F I C A T E** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word for the word as per original Order/Judgment. | | |
| Name of Steno | :- | Y.P. Ambure, Steno (Grade-3) |
| Court Name | :- | A.J. Girhe<br>Jt. CJJD & JMFC,<br>Khed-Rajgurunagar, Pune |
| Date of Order/Judgment | :- | 07/07/2026 |
| Signed by PO on | :- | 07/07/2026 |
| PDF uploaded on | :- | 07/07/2026 |